# "मराठी कादंब–यातुन चित्रित झालेले शैक्षणिक व्यवस्थेतील वास्तव"

संशोधक विद्यार्थी
**मुळाटे श्रीधर सुधाकर**
एम.ए.मराठी–नेट,सेट, मराठी भाषा व वाङमय विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

★★★

**प्रास्ताविक** – स्वातंर्त्योत्तर काळात समाजाच्या विकासाच्या दृश्टीने 'शिक्षण' महत्त्वाचे अंग बनले. ठराविक लोकापर्यंत मर्यादित असणारे शिक्षण तळागाळातील माणसापर्यंत पोहोचले होते. भारतीय संविधानाच्या कलम २१–अ अंतर्गत सहा ते चौदा वर्षाच्या बालकांना मोफत व सक्तीचे षिक्षण झाल्यामुळे दारिर्द्य, गरिबीत जगणाऱ्या समाजातील लोकांच्या बालकांचा शिक्षणाशी संबंध आला. प्राथमिक शिक्षण पूर्ण करेपर्यंत कोणत्याही बालकाला त्याच वर्गात ठेवणे, शाळेतून काढून टाकणे अथवा अनुत्तीर्ण करण्यास मनाई असल्याने शाळेतील गळतीचे प्रमाण झाले. बहुजन वर्गातील तरुण वर्ग शिक्षण घेऊन नोकर्या ला लागला. त्याला सुखाचे दिवस भोगायला मिळाल्याने शिक्षणाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची वृत्ती समाजात निर्माण झाली. त्यामुळे शिक्षणाचा प्रचार व प्रसार होण्यास सुरुवात झाली. प्रारंभी शिक्षण घेताना दारिद्यात जगणार्याव सामाजिक हतबल समूहाला शिक्षण घेताना संघर्ष करावा लागला. उपासमार, अवहेलना, कुचंबणेला तोंड द्यावे लागले. शिक्षणाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग बाहेर पडत होता. त्यामुळे राजकारणी लोकांनी खाजगी शिक्षण संस्था, शासन अनुदान तत्त्वावरील संस्था स्थापन केल्या. शैक्षणिक शाळा, कॉलेजचे जाळे निर्माण झालेय परंतु या संस्था ठराविक जातींच्या मत्तेदारीवर होत्या. मराठा–ब्राह्मण समाजाचे या शैक्षणिक संस्थावर वर्चस्व होते. त्यामुळे सुशिक्षित वर्ग बाहेर पडला आणि सुशिक्षित बेकारीची संख्या वाढीस लागली. त्यामुळे नोकर्यां मध्ये जातीयता जागृत झाली. आरक्षणाच्या जागेवरही गुणवंता कँडिडेट मिळाला नाही शेरा मारून आपल्या जातीच्या उमेदवाराची निवड होऊ लागली. शिक्षण क्षेत्रात यामुळे वशिलेबाजी आणि भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत गेले. खेड्या दृ पाड्यात शिक्षण संस्थाची संख्या वाढीस लागणाने, शिक्षणातील परीक्षातील भ्रष्ट प्रवृतीमुळे शिक्षण क्षेत्रात बाजारीकरण पुढे आले.

शिक्षणात विशिष्ट समुदायाची मतेदारी असल्याने शिक्षकी पेशा लाचार, हतबल बनू लागला. राजकीय हितसंबंधाची,वशिलेबाजी मध्ये गचाळ गटबाजी, जातीयतेची जोड, हेव्यादाव्याच्या आणि सूडाच्या भाव–भावनाला ऊत आला. शाळा, महाविद्यालयाप्रमाणे हे लोण विद्यापीठीय स्तरापर्यंत पोहोचले. शिक्षण व्यवस्थेचा होणारा मूल्यऱ्हास, शिक्षण महर्शी लोकांची आरेरावी, शोषण, स्त्रियांच्या हतबलतेचा फायदा घेऊन लादले जाणारे अनैतिक संबंध, साहित्य,प्रकाषकाची किळसवाणे वर्तन यामुळे भ्रमनिराशा होणे साहजिकच आहे. त्यामुळे नव्या पिढीतील लेखकांनी शिक्षण क्षेत्रातील वास्तव कथा कादंबऱ्यातून मांडले आहे. स्वातंर्त्योत्तर मराठी कादंबऱ्यात शिक्षण क्षेत्रातील तरुणाचा शिक्षणासाठी संघर्ष, अगतिकता, मनाची व्दिधा स्थिती, शिक्षण महर्शीचे जाळे, त्यामुळे शिक्षणातील मूल्यऱ्हास होऊन बाजारीकरण, वशिलेबाजी, भ्रष्टाचार, अनैतिक वर्तन, जातीयता, पैशाच्या हव्यासापोटी भोगवादी बनलेल्या पांढरपेषा समूहाचे वास्तव मराठी साहित्यिकांनी समोर ठेवून कथा–कादबऱ्यातून मांडल्याचे लक्षात येते.

**मराठी कादंबरीतील शिक्षणासाठीचा संघर्ष** – शैक्षणिक कादंबऱ्यामध्ये शिक्षणासाठी केलेल्या संघर्षाची गाथा नायक, प्रतिनायिक, अन्य व्यक्तिरेखाच्या रुपामधून आलेला आहे. हा संघर्ष दुःख, दारिद्रय, भुकेचा प्रश्न, शिक्षणासाठी धडपड व दारिद्रयातून कुंटूबाची सुटका होण्याकरिता असल्याचे वर्णन कादंबऱ्यातून येताना दिसते.

'कोसला' कादंबरीतील पांडूरंगाचा संघर्ष शिक्षणासाठी नसून स्वतःच्या अस्तित्वासाठी आहे. त्याची धडपड नवीन अनुभवातून शिकण्याची आहे. त्याला पुण्यातील पुण्यक्षेत्री अनेकाकडून फसवणूकीची शिकवण मिळते. कोसलातील काही व्यक्तिरेखा शिक्षणासाठी संघर्ष करताना दिसून येतात. त्यापैकी खानोलकर हा गरीब बाहेरुन बी.ए. करणारा बायको, मुलबाळं , नोकरी, घरदार सासूसासरे सांभाळून शिक्षण करीत होता. शिक्षणासाठी त्याचा संघर्ष, जिद्द मनाला स्पर्श करते.

छाया महाजन यांच्या 'कॉलेज' कादंबरीतून शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या तात्पुरत्या नोकरीवरील व गरिबीतून वर आलेल्या प्राध्यापकांचे वर्णन येते. त्यापैकी परमार अगदी गरीबीतून शिक्षण घेतलेला मुलगा. लेखिका त्याचा परिचय देताना म्हणते, "परिस्थितीनं गरीब ' कमवा आणि शिका' योजनेत शिकलेला. विद्यापीठाच्या वसतिगृहातल्या खोलीचं भाड परवडत नाही म्हणून अक्षरषः झोपडपट्टीत राहणारा. धाकट्या भावाला घेऊन येऊन त्यालाही शिक्षण देण्याची ध ‍डपड करणारा" वडील हमाली करणारे, घरात अनंत अडचणी तरीही नोकरी कायम स्वरूपी लागेल आशेवर संघर्ष करीत राहतो कॉलेजातील प्राध्यापकावर त्याच्या जिद्दीची छाप आहे. त्याच्याविषयी वहाब सर म्हणतात, "पर बच्चा अच्छा है, मॅडम.मेहनती है.घरका बहुत गरीब है सुना हूँ". कादंबरीची नायिका मध्यमवर्गिय असल्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिस्थितीचा अनुभव तिला नाही. तिला ऐकीव गोष्टी माहित होत्या. त्यात कॉलेज बहुजनांच असल्याने विद्यार्थ्यींचं नव्हे तर शिक्षक देखील संघर्षातून आलेले होते. "कॉलेजमध्ये बरेच

प्राध्यापक गरिबीतून वर आलेले. शिक्षणासाठी धडपड केलेले. मिळेल ते आणि मिळेल तसं शिक्षण घेतलेले" प्रा. माघारे ,माधवनं कांबळे सर व इन्स्पेक्टर चव्हाण यासारखे पात्रे गरिबीचे अन्यायावरील प्रतिवाद करतांना चव्हाण साहेब कॉलेजचे अध्यक्ष व सचिव यांना मनातील अगतिकता व्यक्त करताना म्हणतो, "जरा जास्त बोललो असेलय पण मनानं कवी आहे मी ! गरीबीतून वर आलोय. अशा गोष्टींनी मन दुखावतं. श्रीमंतांनी गरिबांना जगू द्यायला पाहिजे. हे वाटत तेवढं अवघड नाही.

चांगदेव चतुष्टयातील नामदेव भोळे शिक्षणाचा गंध नसणाऱ्या धनगर समाजातील आहे. शिक्षणासाठी मुलूकगिरी केल्याप्रमाणे मामा, मावशी, काकूच्या गावची बोर्डिंग, बहिण असा शिक्षणाच्या प्रिन्सिपॉलकडे बंगल्याबाहेरच्या बागेत एका छानशा खोलीत दोन वर्ष. त्याच्या घरची सटरफटर काम करून अहोरात्र वाचन, अभ्यास". नामदेवाच्या संघर्शमय शिक्षणाप्रमाणे या समाजातील बिकट स्थितीत षिकलेला डॉ. शेळके 'व्हायरस' कादंबरीतून येतो. परंतु डॉ. स्वतः ऐवजी व्यवस्थेविषयी अधिक बोलतात इतिहास विषयाशी संबंधीत विद्यार्थ्यांची अगतिकता ते अचूकपणे मांडतात. त्यापैकी प्रशांत काळोखे भटक्या प्रवर्गातील तरूणाला गुणवत्ता असूनही केवळ मागासवर्गीय असल्याने संस्थाचालक नोकरीवर घेत नाही. डॉ. शेळकेच्या मार्गदर्शनातून तो कुलगुरूकडे तक्रार करतो. परंतु कुलगुरूकडून त्याला न्याय मिळण्याऐवजी त्रास सहन करावा लागतो. कोर्टात न्याय मिळेल आशेने जमीन विकुन वकील दिला परंतु कोर्टाने प्रकरण नाकारले. शेतमजुरांच्या मुलाला व्यवस्थेविरुद्ध संघर्ष केला तरी न्याय मिळत नाही याच जीवंत उदाहरण लेखकाने चित्रित केले आहे. दुसरा विद्यार्थी,चिवटे हा अफाट वाचन, सूक्ष्म चिकित्सा यामुळे त्याला इतिहासकार म्हणून ओळख. घरात गरिबी असल्याने लहानपणापासूनच किराणा दुकानदार काम करत. शिक्षण घेतो. धावतपळत शिक्षण करणाऱ्या चिवटेचा संघर्ष मनाला स्पर्श करणारा आहे. उदा. "अहो सर, आम्हाला कोण देणार प्राध्यापकाची नोकरी? तुमचा काळ गेला आता". किंवा "गरिबांच्या पोटी जन्म घेतला हाच आमचा गुन्हा आहे सर".६ शिक्षण व्यवस्थेतील कुचकामीपणा व्यक्त करत असता लेखकाने चिवटेच्या माध्यमातून पोटाची खळगी भरण्यासाठी संघर्ष करणाऱ्या तरूणास प्रतिनिधीक स्वरुपात चित्रित केले आहे. नंदिनी सुर्वे हिचा शैक्षणिक संघर्ष तर निराळाच आहे. त्याच्यापेक्षा जास्त पगाराची बायको नको असणाऱ्या नवऱ्याला तिला शह द्यावयाचा आहे. एकूण शिक्षण व्यवस्थातील संस्थाचालक, बेकारी आणि अस्तित्व यादृष्टीने हा शैक्षणिक संघर्ष येताना दिसतो.

शैक्षणिक कादंबऱ्यामध्ये स्वानुभव कथन करणाऱ्या कादंबऱ्यातून नायकांचा संघर्ष प्रखरतेने वास्तव चित्रित करतो. 'झोंबी'तील आनंदा, पागोरा'तील अवधूत व धूळपेरणी'तील श्रीराम या नायकांचा संघर्ष आपल्या कुटुंबाचा उध्दार करण्यासाठी शिक्षण घेण्याची दृष्टीने आहे.

शिक्षणाच्या संघर्शातून काही शिक्षकाचे जीवन आलेले असते. त्यांनाही विद्यार्थीदशेत दारिद्रय, उपासमार, हाल आपेष्टातून शिक्षण घेतलेले असते. या शिक्षकांचे वर्णन स्वातंर्त्योत्तर मराठी कादंऱ्यातून येताना दिसते. मराठीतील सर्व प्रश्न अनिवार्य' मधील सिद्धेश्वर सपकाळ, कॉलेज मधील माघारे सर , हाताची घडी तोंडावर बोट मधील राधाकृष्ण शिपटेकर, झूल मधील नामदेव भोळे, झूंड मधील आनंद काशीकर व दौलत कांबळे इत्यादी या शिक्षकांचे जीवन चित्रण शिक्षणासाठी केलेल्या संघर्षातून प्रतिपादित झाले आहे. ज्यांनी शिक्षण घेण्यासाठी अंतोनात कष्ट घेतले. शिक्षणांचा गंध नसताना शिक्षक पेशामध्ये आपले अस्तित्व निर्माण केले.

**शिक्षण व्यवस्थेतील राजकारण** – राजकारण हा केवळ सत्तासंघर्ष नसतो. तर त्याला अनेक पदर असतात. ज्याची कल्पना सर्वसामान्य माणसाला नसते. सामान्यांची दिशाभूल करणे हा या व्यवस्थेचा स्थायीभाव आहे. हे राजकारण केवळ व्यवस्थेतच नव्हे तर शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात शिरलेले आहे. स्वातंर्त्योत्तर कादबऱ्यातून शिक्षकांना ग्राम पातळीपासून ते उच्चशिक्षण, नोकरीपर्यंत राजकारणाच्या व्यवस्थेला बळी पडावे लागते. किंबहुना अनेक शिक्षक –शिक्षकांचे हितसंबंध, संस्थाचालक, प्राचार्य अथवा मॅनेजमेंट व प्राचार्य संबंध, शिक्षकामधील हेवेदावे, कॉलेजमधील अथवा विद्यापीठातील प्राध्यापकामधील हितसंबंधांचे राजकारण, स्थानिक अथवा गावपातळीवरील राजकारण यातून हे प्रखर वास्तव कादंबऱ्यातून चित्रित होत असल्याचे जाणवते. शिक्षणात शिरलेल्या राजकारणाचे चित्रण प्राथमिक, माध्यमिक, कॉलेज व विद्यापीठीय स्तरावर असल्याचे स्पष्ट करता येते.

शिक्षण क्षेत्रातील राजकारणाचा प्रारंभ ग्रामपातळीवर होऊ पाहत आहे. ग्रामीण भागातील शालेय शिक्षक विद्यार्थी यांना राजकीय स्थितीचा फटका बसतो.

'निशाणी डावा अंगठा' या कादंबरीमध्ये साक्षरता अभियान केंद्रस्थानी असले तरी गावपातळीवरील बदललेले राजकारण आणि समाजकारणाची चर्चा होताना दिसते. विविध राजकीय पक्ष ग्रामपातळीवर पोहचले आहोत. त्यांच्या गटबाजीच्या राजकारणामुळे षिक्षकांना करावी लागणारी कसरत, साक्षरतेच्या अंतिम मूल्यमापनासाठी गावातील राजकीय पक्षांना सहभागी करून घेतल्याशिवाय कार्य पूर्णत्वास जाणे शक्य नसल्याची जाणीव शिक्षकांच्या संवादातून येते.

"भाऊ धनुष्यवाले बोलावले की नाही? सगळे बोलावले पंजावाले, कमळवाले, धनुष्यवाले, घड्याळवाले–एकेक हत्तीवाला अन् तराजूवालाबी घेतला बोलावून".

"सगळे बोलावले हे बर केलं धनुश्यवाल्याकडे पुन्हा निरोप धाडा. एकदा अजून नाही तं त्याहीचे भाते केव्हाबी खांद्यावरच राहतात बरंकृ "हा वोकृते बी खरंच पण सध्या तं आपल्याले सगळयाही जावाईबुवा सगळे आले की तुम्ही प्रस्तावना करून मार्गी लावून द्या. मग मी अन् जुंबडसर लोण्याहीचे गोळे घेऊन तयारच राहतो". येथे

बदलत्या राजकीय परिस्थितीची नोंद शैक्षणिक कादंबऱ्यातून येत असल्याचे दिसून येते. ग्रामपातळीवरील शिक्षक व ग्रामस्थ राजकारणी यांच्यातील हितसंबंध या सारख्या प्रसंगातून चित्रित होतात.

शालेय शिक्षणाचे चित्रण 'हाताची घडी तोंडावर बोट' या कादंबरीतून होत असताना ग्रामपातळीवरील राजकीय प्राबल्य चित्रित होताना दिसते. येथे पक्षांचा स्पष्ट उल्लेख नसला तरी राजकारणांनी लोकांचे शिक्षक–शिक्षिका यांच्यावर. वर्चस्व गाजवितात. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या लुडबुडपणामुळे शिक्षकाला आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावताना अडचणी निर्माण होतात. तसेच बोंडाळ गुरूजी सारख्या शिक्षकांचे सरपंच बापूसाहेब उर्फ हौशा तिरवाडकर उर्मट राजकारणी सोबत संबंध असल्याने ऑफिसकडे तक्रार करता येत नाही.श्री सोमाजीराव चोरगावकर हे नुकतेच जिल्हा परिशदेच्या शिक्षणखात्यावर निवडून गेल्याने सरपंच तिरवाडकर नाकाचीवाडी व आजूबाजूच्या दहा–बारा शाळातील शिक्षकांना बोलावून सत्काराचे नियोजन करण्यासाठी सभा घेतो.ही सभा वेळेवर घेत नाही. स्वतःच्या सोयीनुसार बैठकीच्या ठिकाणी येतो. काही शिक्षक कंटाळून निघून जातात. तेंव्हा सरपंच म्हणतो, "मी तालुकापंचायत समितीच्या सभापतीना विचारतो शिक्षकांना असं सरपंचाच्या परवानगी षिवाय जाता येतं का? सरपंच तिरवाडकरांच्या ग्रामपातळीवर राजकारणाचा प्रभाव शिक्षकावर असल्याचे तसेच त्याच्या बदल्या करण्यासाठी, तक्रारी करण्यासाठी व आडमार्गी गावी बदली करण्याच्या त्रासाला शिक्षक सहन करतात. अधिकारी देखील सरपंचाच्या कोबंड खाण्याच्या लालचीने सरपंचाची मनमानी चालवतात.

'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीमध्ये देखील ग्राम पातळीवरच्या राजकारणाचा प्रश्न आलेला आहे. परंतु हे राजकारण तालुका पातळीवर येते. सारंगपूर येथील कॉग्रेसचा आमदाराच्या लायकीचा माणूस पंचायत समितीचा सभापती आहे. कारण हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी सुटल्याने सेनेविरूध्दी उभा आपल्या पक्षातील उमेदवाराला निवडून आणलेल्या विलासदादाचा दबदबा आहे.त्याचा मुलगा मोटेगाव बुद्रुक शाळेत शिक्षण घेतो. मांजरसुंबा केंद्रावर ही परीक्षा होणार होती. ६ ानोकार सर त्यांच्या गावातील शिक्षक सभापतीच्या मुलाला स्कॉलरशिपच्या परिक्षेत राज्यात पहिला आणून सभापतीकडून प्रशंसा मिळवण्यासाठी प्रयत्नाची शर्थ करतो. सपकाळ सर त्याला यशस्वी होऊ न देता परीक्षेत गैरप्रकाराला विरोध करतात. गावच्या लोकांना दादाचा अपमान वाटल्याने त्यांनी देवप्रिंपीची शाळा गाठली. कार्यकर्त्यांच्या प्रश्नावरून त्यांचा रूबाब समजून येईल. "तसं तुमालेच तिकडं बलवता आलं आस्तं पण म्हटलं आपुनच जाऊन पाहू कोण मायचा लाल हाये ज्यो दादाले वळखत नाही". किंवा 'मास्तर, दादांच्या पोराले वर्गातून हाकलून द्यायच्या आधी पुढं काय होईल याचा काही इचार केला नाही वाटतं तुम्ही? किंवा साताशे मास्तरलोकंहे पुऱ्या ब्लाकमधी आजून कोण एवढी हिंमत नव्हती केली'. किंवा 'पण मी म्हंतो मुकाट्यानं नोकरी करायची सोडून बांडयापंचायची करात कषाले ?"६ सभापतीच्या कॅबीनमधून बाहेर पडलेल्या गटषिक्षणाधि ाकाऱ्यांनी घटनेची चौकशी करण्यासाठी मांजरसुंब्याला जायचं ठरवलं केंद्रप्रखुक, हेडमास्तर, शिक्षक यांच्या खोट्या जबाण्यातून सपकाळ सरांवर निलंबनाच्या कारवाईचे पत्र काढले. शिक्षण क्षेत्रातील या राजकीय खेळीचा बळी ठरलेल्या शिक्षकाला पडलेल्या प्रश्नाच्या काहूरातून पुढे कादंबरी परीक्षेतील गैरमार्गाचे अवलोकन करते.

'कळप' कादंबरीतून गाथी पक्षाच्या घोसरवाडकर उर्फ गांधीनंतरच्या महात्म्याचे राजकीय प्राबल्य चित्रित होते. घोसरवाडकरांची मर्जी सांभाळण्यासाठी सनमाडीकर सर, महाजन सर, सुरेश संकेश्वरी, चिंचवाडे सर हे कॉलेज शिक्षक सतर्क राहतात. पक्षावाले सामाजिक कार्याच्या नावाखाली तरूणांना हाताशी धरतात. गाथी पक्षावाले व कॉग्रेस राजकारणातील सुशिक्षित, तडफदार तरूणाची अवस्था विदाळक पध्दतीने लेखकाने चित्रित केली आहे.

झुंड– शरणकुमार लिंबाळे, व्हायरस– रवींद्र ठाकूर, पागोरा– रमेश अंधारे यांच्या कादंबरीत शैक्षणिक व्यवस्थेतील भ्रष्टाचार, वाईट वृत्ती, प्रवृती यात चिरडला गेलेला विध्यार्थी, शिक्षक आणि समाज याचे विदारक सत्य चित्रित झाले आहे.

**सुशिक्षित बेकारीचे वर्णन** – स्वातंर्त्योत्तर मराठी कादंबरीमध्ये सुशिक्षित बेरोजगार तरूणाचे वर्णन येते. शिक्षण घेऊन समस्या सुटत नाही नोकऱ्यातील वशिलेबाजी, जातीयवाद, धर्मवाद, अगतिकता, प्रभावषून्यता, नैराश्य, हतबलता अन्य कारणानी तरूण वर्ग सुशिक्षित बेकारीमध्ये जगतो. काहीच्या पोटापाण्याचा प्रश्न सतत नजरेसमोर असतो. काही परिस्थितीला सामोरे जातात तर काही तरूण आत्महत्या करीत असल्याचे वास्तवाभिन्मुख वर्णन कादंबऱ्यातून येते.

भालचंद्र नेमाडे यांच्या बिढार मधून महानगरीय शहरातील तरूणाच्या बेरोजगारीचे चित्रण येते. चांगदेव मित्राची ओळख करताना म्हणतो, "त्यातून नाम्या आणि सारंग सध्या बेकारच होते. बापू अधूनमधून बेकार. त्यांना यांच्या त्यांच्याकडे जाऊन नवीन बातम्या काढणं सांगण आणि स्वतःचा वेळ घालवत चहा जेवण काढणं हेच उद्योग होते". शंकर देखील बेकारीतच होता. त्याचे जीवन स्थिर नव्हते. पेपरमध्ये लेख लिहिणे. प्रकाशकाकडे थोडेफार काम करून जगण्याचा उद्योग करतो. 'हूल', 'जरीला' कादंबऱ्यात मुलाखतीसाठी भेटतो. कानडी असणाऱ्या हूलमणीला बार्शीच्या कॉलेजमध्ये केवळ पाच इन्क्रीमेंट मुळे काढले जाते. जातीयतेच्या गटबाजीत त्याला कोणीही स्वीकारत नाही. मुलाखतीसाठी येणारे प्राध्यापक उमेदवार सुशिक्षित बेकार आहेत. त्याची होणारी घुसमट लेखकाने प्रभावीपणे मांडली आहे.

'कॉलेज' छाया महाजन यांच्या कादंबरीतून येणारा सुषिक्षित बेकार तरूण परमार गरिबीने ग्रासलेला आहे. ज्या कॉलेजात तो तात्पुरती नोकरी करतो. तेथे आज उद्या आपणास नोकरी मिळेल आषेवर असणाऱ्या परमारला नोकरीवरून काढले जाते तेव्हा तो आपण

कुटुंब, भावास सांभाळण्यास असमर्थ आहोत अशी चिठ्ठी लिहून कॉलेजातच आत्महत्या करतो.

'व्हायरस' रवींद्र ठाकूर कादंबरीतून प्रशांत काळोखे, इतिहासकार चिवटे हे सुशिक्षित बेकार तरुण नोकरी नसल्या कारणांनी हतबल झाले आहेत.

'कळप' राजन गवस यांच्या कादंबरीत सुरेश संकेश्वरी, दिलावर व तांबट हे सुशिक्षित बेकार येतात. नोकरीसाठी सुरेशची अगतिकता टोकाची आहे. तो म्हणतो "अलीकडे जगायला नको वाटाय लागलंय. कुठंही कारकुनाची, शिपायाची नोकरी लागली तरी मला हवी आहे" मुस्लिमनांना कोणत्या संस्थेत नोकरी मिळत नाही. कमवता मुलगी बेकार असल्याने घरी मनस्ताप होतो. त्याच्याही मनातील घालमेलीत फरक नाही तो म्हणतो, "मला तर आता सगळचं संपवावं असं वाटाय लागलंय नोकरी तर नाहीच मिळणार". सुशिक्षित बेकार तरूणाची दुरावस्था लेखकाने वास्तवपणे मांडली आहे. स्वकथनपर 'धूळपेरणी' शेषेराव मोहिते यांच्या कादंबरीत श्रीरामचीही अशीच अगतिकता पाहावयास मिळते. आपण घेतलेले षिक्षण निरूपयोगी असल्याचे समजून तो हतबल होतो अशा सुषिक्षित बेकार तरूणांची अगतिकता, अवहेलना, जातीयता, मनाची घालमेल कशी होते हे अचूकपणे मांडले आहे.

**समारोप**– स्वातंर्त्योत्तर काळात शिक्षणाचा स्तर सर्व जाती–धर्माच्या लोकांपर्यत पोहोचला होता. शिक्षण सक्तीचे झाल्याने सर्वसामान्य लोकांनाही शिक्षणाची पिढी बाहेर पडली तशी सुशिक्षित बेकारी वाढत गेली. दुरूख, दारिर्द्य, हाल–अपेष्टा सहन करून शिक्षण घेतलेल्या तरुण वर्गाला शिक्षणातील ठराविक मक्तेदारी, शिक्षण संस्था राजकारणी लोकांचे वर्चस्व जनसामान्यांची दिशाभूल करणारे असल्याची जाणीव साहित्यकृती होऊ लागली. शिक्षण क्षेत्र राजकारणीच्या बाहुपाशात असल्याने गैरमार्गाचा शिरकाव झाल्याचे स्पष्ट होते.

***संदर्भ***


*१) महाजन छाया,कॉलेज, मेहता पब्लिसिंग हाऊस,पुणे, फेब्रुवारी २०१५,पृ१२*

*२) तत्रैव,पृ क्र.१७*

*३) तत्रैव,पृ क्र.१९*

*४) तत्रैव,पृ क्र.२४९*

*५) नेमाडे भालचंद्र, झूल,पॉप्यलर प्र.२०१५पृ क्र.*